माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ३११३ अ/२०२३/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| अमीन मोहम्मद राफिफ कासम | सहाय्यक नगर रचनाकार,नियोजन विभाग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे | नगर रचनाकार, नियोजन विभाग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे |

( सुनावणी दिनांक - २१/०७/२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.२२.०५.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेलया निर्णयाने समाधानी नसल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व उत्तरवादी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.२१.०७.२०२२ च्या माहिती अर्जात मालवली गावातील एम.टी.सी असोसिएट्स चे श्री.राजेंद्र पवार साहेब यांच्यासह सुनावणी कार्यवाही पत्रक दि. २०.०७.२०२२ रोजी टोकन क्रमांक ए-३५ च्या कार्यवाही केलेल्या पत्रांची माहिती तसेच अमरजीत थापर यांनी सही केलेल्या उपस्थिती यादीची छायांकित प्रतींची माहिती मागितलेली आहे.

उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस माहितीचे प्रदान झालेचे दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगर रचनाकार,नियोजन विभाग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार,नियोजन विभाग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३११३ अ/२०२३/ पुणे 9540/2025 दिनांक - 13/10/2025